RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ९, अंक २१] गुरुवार, जून ८, २०२३/ज्येष्ठ १८, शके १९४५ [पृष्ठ १, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक २८**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक

**आदेश**

क्र.विआशा/पंरा/१५५९४/२०२३/जा.क्र.६५३८.— मेथी ग्रामपंचायत, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील ११ सदस्य व १ थेट सरपंच या पैकी ८ सदस्य पदे रिक्त झालेली आहेत. ग्रामपंचायतीच्या एकूण सदस्य संख्येच्या निम्म्याहुन अधिक जागा रिक्त झालेल्या आहेत. जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडील पत्र क्र.क/कक्ष-५/ग्रापनि/कावि/१५६/२०२३, दिनांक ८ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या ग्रामपंचायत विघटीत करणेबाबतचा अहवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचेकडील पत्र क्र. धुजिप/ग्रापं/१/३/४८६/२०२२, दिनांक २४ ऑगस्ट २०२२ चा अहवाल व ग्रामविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.व्हीपीएम-३६८९/१२३८(३३००)/२१, दिनांक २१ जून १९८९ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून, मी, राधाकृष्ण गमे, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४५(१अ) अन्वये, उपरोक्त अहवालानुसार सादर केलेल्या कागदपत्राचे अवलोकन करून हा आदेश शासकीय **राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून, मेथी ग्रामपंचायत, ता. शिंदखेडा, जि. धुळे विघटीत करणेबाबत आदेश देत आहे.

नाशिक,
दिनांक ६ जून २०२३

**राधाकृष्ण गमे,**
विभागीय आयुक्त, नाशिक.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.